**मे. वांजरी लाईमस्टोन माईन-११.८९८ हे. आर. खसरा क्रं. १०५, १०७, १०८ आणि १११, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ या उद्योगाद्वारे वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ येथे प्रस्तावित वाढीव उत्पादन क्षमता ५०,००० टन प्रती वर्ष ते ३,००,००० टन प्रती वर्ष व प्रकल्प क्षेत्र-११.८९८ हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणीचे इतिवृत्त**

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **१९/०५/२०२२** |
| **वेळ** | **:** | **सकाळी ११.०० वाजता** |
| **स्थळ** | **:** | **प्रकल्प स्थळ, मे. वांजरी लाईमस्टोन माईन, खसरा क्रं. १०५, १०७, १०८ आणि १११, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ** |

**प्रस्तावना:-**

मे. वांजरी लाईमस्टोन माईन-११.८९८ हे. आर. खसरा क्रं. १०५, १०७, १०८ आणि १११, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादन क्षमता ५०,००० टन प्रती वर्ष ते ३,००,००० टन प्रती वर्ष व प्रकल्प क्षेत्र-११.८९८ हेक्टर प्रकल्पांच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर राज्यस्तरीय पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (SEIAA) यांनी त्यांच्या दि. ०१ जुलै २०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास प्राथमिक पत्र (TOR) जारी केले (सहपत्र-१) व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने दि. १९/०५/२०२२ ही तारीख निश्चित करण्यात आली होती. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, म.प्र.नि. मंडळाने दि. १२/०४/२०२२ रोजीच्या मराठी दैनिक "लोकमत" व इंग्रजी दैनिक "द टाईम्स ऑफ इंडीया" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

१. पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकिय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२. सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६. जिल्हा परिषद, यवतमाळ.
७. जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८. उप-विभागीय कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
९. नगर परिषद, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१०. तहसिल कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
११. पंचायत समिती कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१२. ग्राम पंचायत कार्यालय, राजूर, ता. वणी, जि. यवतमाळ.
१३. ग्राम पंचायत कार्यालय, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१४. ग्राम पंचायत कार्यालय, मजरा(नागाळा), ता. वणी, जि. यवतमाळ.
१५. ग्राम पंचायत कार्यालय, नांदेपेरा, ता. वणी, जि. यवतमाळ.
१६. ग्राम पंचायत कार्यालय, भांदेवाडा (सोनापूर, बोदाड), ता. वणी, जि. यवतमाळ.
१७. ग्राम पंचायत कार्यालय, कळमना खु., ता. वणी, जि. यवतमाळ.
१८. ग्राम पंचायत कार्यालय, रांगणा, ता. वणी, जि. यवतमाळ.
१९. ग्राम पंचायत कार्यालय, भुरकी(पोहणा), ता. वणी, जि. यवतमाळ.
२०. ग्राम पंचायत कार्यालय, निंबाळा(रोड), ता. वणी, जि. यवतमाळ.
२१. ग्राम पंचायत कार्यालय, शेलू खु., ता. वणी, जि. यवतमाळ.

वरील अनुक्रमांक ५ ते २१ वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्पामुळे बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, मे. वांजरी लाईमस्टोन माईन, खसरा क्रं. १०५, १०७, १०८ आणि १११, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाच्या ठिकाणी असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली होती (कार्यालयीन आदेश क्रं. ई-३१/२०२२ दि. १३/०५/२०२२-सदस्य सचिव यांचे पत्र क्रं. BO/JD(WPC)/PH/B-२२०५१३-FTS-००१३, सहपत्र-१)

१) श्री. ललितकुमार वऱ्हाडे, - **अध्यक्ष,**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ

२) श्री अशोक मा. करे, - **सदस्य**
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

३) श्री. अतुल पु. सातफळे - **समन्वयक**
उप-प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाची जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. अतुल सातफळे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या पध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक, सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

तद्नंतर जनसुनावणी समितीचे सदस्य श्री. अतुल सातफळे, उप-प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर यांनी मे. वांजरी लाईमस्टोन माईन, खसरा क्रं. १०५, १०७, १०८ आणि १११, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्या प्रस्तावित वाढीव उत्पादन क्षमता ५०,००० टन प्रती वर्ष ते ३,००,००० टन प्रती वर्ष व प्रकल्प क्षेत्र-११.८९८ हेक्टर प्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना, आक्षेप व आपल्या भावना कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई येथे सादर करण्याकरिता मंडळाच्या मुख्यालयात पाठविण्यात येते. ही समिती फक्त लोकांचे या प्रकल्पाबाबत मत नोंदविण्यासाठी असून, समितीला कोणताही निर्णय घेण्याचा

व शिफारस करण्याचा अधिकार नाही. जनसुनावणीत उपस्थित मुद्दयांना व त्यास प्रकल्प धारकांनी दिलेले उत्तर याबद्दल अहवाल तयार करुन पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना सादर करावयाचा असतो. व त्यावर पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई पुढील निर्णय घेतात. सदर सुनावणीची छायाचित्रीकरण म.प्र.नि. मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील व त्यानंतर त्यांनी प्रकल्पधारक यांनी प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्री. चंद्रकांत जाधव, पर्यावरण सल्लागार यांनी सदर नियोजीत प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमीन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणीदरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे आहेत:**

**१) श्री. विजय आनंदराव पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वतीने ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे त्याकरिता आक्षेप देण्यासाठी एक टेबल उपलब्ध करून दिलेला नाही. या पूर्वी झालेल्या जनसुनावणीदरम्यान या प्रकारची सोय उपलब्ध होती. ही चूक म.प्र.नि. मंडळाने सुधारावी. प्रकल्पाबाबतचे सादरीकरण योग्यरीत्या दिसत आहे किंवा कसे याबाबत शहानिषा केलेली नाही. सादरीकरणासाठी व्यवस्थित मंडप उभारून त्याचे एका खोलीमध्ये रूपांतर करणे गरजेचे होते जेणेकरून येथे उपस्थित जनतेस सादरीकरण स्पष्टपणे दिसले असते. तसेच मे. वांजरी लाईमस्टोन खाण प्रकल्प सन २०१२ पासून म्हणजेच मागील दहा वर्षांपासून कार्यरत आहे. परंतु सदर प्रकल्पधारकाने मागील दहा वर्षांमध्ये किती प्रमाणात हरीतपट्टा निर्माण केला किंवा किती झाडे या क्षेत्रामध्ये लावली याबाबतची माहिती सादरीकरणादरम्यान ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून दाखवायला हवी होती. त्यामुळे येथे सादर केलेला अहवाल आम्हा जनतेस खोटा वाटतो. सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर झाडे लावलेली आहेत परंतु प्रत्यक्षात येथे कोणत्याही प्रकारचे वृक्षारोपण झाल्याचे दिसून येत नाही. तसेच खाणीकडे येणाऱ्या रस्त्यावर ३५० झाडे लावल्याचे लिखीत स्वरूपात सादर करण्यात आले आहे परंतु तसे कुठेही दिसत नाही. सदर विस्तारीकरण प्रकल्पापासून खाणीच्या रस्त्याच्या भारक्षमतेमध्ये तफावत दिसून येत आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये खाण रस्त्याची क्षमता ३० टन दर्विण्यात आलेली आहे व कार्यकारी सारांशमध्ये १०-२० टन दाविलेली आहे. यावरून असे निदर्शनास येते की, सदर विस्तारीकरण प्रकल्पाचे प्रकल्पधारक खोटी माहिती शासनास देऊन शासनाची फसवणूक करीत आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | जनसुनावणीदरम्यान कागदोपत्री खोटी माहिती का सादर करण्यात आली याबाबतचा खुलासा देखील देण्यात यावा. याविस्तारीकरण प्रकल्पातून जी मालाची वाहतूक होणार आहे त्यारिता ४० टन क्षमतेचा रस्ता बांधण्याची गरज आहे परंतु खाणधारकाने खाणीतूननिघणाऱ्या मालाच्या वाहतूकीकरिता ४० टनाचा रस्ता बांधला किंवा कसे याची शहानिषा होणे देखील गरजेचे आहे. लाईमस्टोन हा खाणीतून मुख्य रस्त्यापर्यंत ताडपत्रीचे आच्छादन करून वाहतूक करण्याचे प्रस्तावित आहे परंतु प्रत्यक्षात लाईमस्टोनची वाहतूक ताडपत्रीचे आच्छादन न करताच करण्यात येते असा येथील नागरीकांचा अनुभव आहे. परिवहन विभागाकडून याबाबतची माहिती उपलब्ध करून घेता येईल कि या परिसरात कोणत्याही प्रकारच्या आच्छादनाविना वाहतूक करण्यात येत होती. तसेच पोलिस विभागाचे अधिकारी व महसूल विभागाचे अधिकारी येथे हजर असतील तर त्यांनी देखील ताडपत्रीचे आच्छादन येथे कधी पाहीलेले नाही. खनिज वाहतूकीदरम्यान लगतच्या शेतपिकांचे जसे कि कापूस व सोयाबीन यापिकांचे जडवाहनांच्या वाहतूकीमुळे धूळ उत्सर्जन होऊन नूकसान होणार नाही यारिता पाणी फवारणी यंत्रणा बसविलेली आहे काय याबाबत माहिती देण्यात यावी. खाण सुरू करताना येथील स्थानिक नागरीकांच्या आरोग्याबाबतचा अहवाल सादरीकरणादरम्यान कोठेही दाखविण्यात आलेला नाही. म.प्र.नि. मंडळाने जनसुनावणी आयोजित करायची व जनतेने घसा कोरडा होईपर्यंत प्रश्न मांडायचे तसेच प्रकल्पधारकाने खोटी माहिती सादर करून पर्यावरणीय मंजूरी प्राप्त करायची हा प्रकार अत्यंत निंदनीय आहे. | |
| २ | शेतकऱ्यांच्या पिक नूकसानीबाबत खाणधारकाने कोणते धोरण ठरविले आहे. तसेच संबंधित शेतकऱ्याला किती नूकसान भरपाई देण्यात येईल याची माहिती देण्यात यावी जेणेकरून त्याचा उदर्निवाह योग्यरीत्या होऊ शकेल याबाबतची माहिती देण्यात यावी. तसेच जे धोरण येथे ठरविण्यात येईल त्या धोरणाच्या अंमलबजावणीची खात्री येथे देण्यात यावी. | |
| ३ | मी जनसुनावणीचे मा. अध्यक्ष यांचेकडे तसेच म.प्र.नि. मंडळाकडे माझे लेखी निवेदन सादर केला आहे. वांजरी खाण ते मुख्य रस्त्यापर्यंत झाडे लावणे ज्याकडे सन | |

| | | |
|---|---|---|
| | २०१२ पासून ते आजपावेतो खाणधारकाकडून अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. तसेच प्रकल्पधारकाने जनसुनावणीदरम्यान सादर केलेल्या खोट्या माहिती करिता त्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळ प्रदूषण नियंत्रण कायद्याच्या कलमांतर्गत नोटीस बजाविणार आहे किंवा कसे याची माहिती देखील देण्यात यावी. तसेच आजपर्यंत वृक्ष लागवड न केल्यामुळे प्रकल्पधारकास मागील प्रस्तावित वृक्ष संख्येपेक्षा दुप्पट किंवा तिप्पट संख्येने वृक्ष लागवड करण्यात यावी असे निर्देश देण्यात यावे. तसेच प्रकल्पधारकाने खोटी माहिती सादर केली त्याबाबत खाण प्रकल्पाच्या विस्तारीकरण प्रकल्पास पर्यावरणीय मंजूरी देताना विचार करण्यात यावा. | |
| ४ | खाणीजवळचा मुख्य रस्ता ते राज्यमार्गापर्यंतच्या रस्त्याचे रूंदीकरण होणे आवश्यक जेणेकरून वणी ते राळेगांव व लगतच्या परिसरातून होणारी दैनंदिन वाहतूक सुरळीतपणे होईल. प्रस्तावित केल्याप्रमाणे येथे ११२ ते १२० ट्रकची रहदारी या रस्त्यावरून होईल त्यामुळे या रस्त्याची भारनियमन क्षमता देखील वाढविण्यात यायला हवी. | |
| ५ | सादरीकरणादरम्यान सांगितल्याप्रमाणे धूळ दडपण्यासाठी येथे पाणी फवारणी करणे प्रस्तावित आहे. वाहतूकीदरम्यान ट्रकमधून खडक पडून त्यावरून होणाऱ्या वाहतूकीमुळे धूळीचे उत्सर्जन होते. पाणी फवारणी करण्याबाबत जे सादरीकरणामध्ये सांगण्यात आले ते म्हणजे अडाणीपणा आहे असे मला वाटते. परंतु वरच्या वर होणाऱ्या धूळीच्या उत्सर्जनावर फॉगींग मशीनशिवाय पर्याय नाही. तसेच वाहतूकीच्या कोणत्याही नियमांचे येथे अनुपालन होत नाही. आज म्हणजेच दि. १९/०५/२०२२ रोजी वणी शहराची हवा गुणवत्ता निर्देशांक हे १२२ आहे. जे अतिशय प्रदूषित आहे. मानवी आरोग्यास वणी शहराची हवा अनुकूल नाही आहे. सरासरी एखाद्या शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक हा जास्तीत जास्त ८० असायला हवा परंतु वणी शहराचा हवा गुणवत्ता निर्देशांक १००, १२० व १३९ पर्यंत देखील पोहोचलेला आहे. सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे येथे प्रत्यक्षात काही होताना दिसत नाही. या क्षेत्रात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून पर्यावरणाची जनजागृती करण्यात आलेली नाही. तसेच | |

| | | |
|---|---|---|
| | खनिकर्म विभागाच्या नियमांचे देखील येथे अनुपालन होताना दिसत नाही. प्रकल्पधारकाने कायदेशीररीत्या प्रशासनासमोर कागदपत्रे सादर करून बेकायदेशीरपणे परवानगी देणे ही बाब अतिशय अयोग्य आहे. | |
| ६ | वांजरी गावामध्ये खनिज विकास निधी पूर्णपणे खर्च केला पाहिजे. प्रकल्पग्रस्त नागरीकांनी राज्य शासन व केंद्र शासनाकडे प्रकल्पामुळे त्रास होत असल्यामुळे विविध प्रकारची आंदोलने केली. प्रकल्पधारकाने खाणकाम करत असताना रस्ते, पाणी, आरोग्य,वीज पूरवठा व शिक्षणाच्या सोई उपलब्ध करून द्यायला हव्या. त्याकरिता १९९७ मध्ये महाराष्ट्र राज्यात खनिकर्म मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. तेव्हा प्रकल्पाच्या २५ किमी क्षेत्रात खनिज विकास निधी खर्च करण्याचे प्रस्तावित होते. त्यानंतर सन २०१६ मध्ये हे अंतर २० किमी अंतरापर्यंत कमी करण्यात आले व त्यानंतर केंद्र शासनाच्या पत्रानूसार ही मर्यादा ५ किमी अंतरापर्यंत कमी करण्यात आली. या अनुषंगाने आपल्या लक्षात आणून देऊ ईच्छितो की, वांजरी लाईमस्टोन खाण प्रकल्पधारकाने अशा प्रकारचा कोणताही आराखडा तयार केलेला नाही. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानूसार खनिज विकास निधी प्रकल्पाच्या ५ किमी क्षेत्रातच खर्च व्हायला हवा. त्याकरिता या क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त, जागरूक नागरीक, लोक प्रतिनिधी यांनी पाठपुरावा करून या क्षेत्रात होणाऱ्या अपहाराबाबत केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून दिले की, सदर निधी प्रकल्पापासून २५ किमी अंतरावर खर्च होत आहे व ५ किमी अंतराबाबतचे पत्र सन २०१९ मध्ये केंद्र शासनाने नियमांमध्ये बदल करून प्रकाशित केले आहे. तीन वर्षे उलटूनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. वणी तालुक्यातील या प्रकल्पापासून ५ किमी अंतरावर असणाऱ्या गावांची यादीबाबत मा. उपविभागीय अधिकारी, मा. तहसिलदार यांचेकडून निश्चित करून घेऊ शकतो. म्हणजेच खाणपट्ट्यापासून ५ किमी अंतरावर किती गावे आहेत याची खातरजमा करू शकतो. याप्रमाणे आपण खनिज विकास निधीचा गैरवापर टाळू शकतो अन्यथा हा देखील प्रकल्पग्रस्तांवर अन्याय आहे. सादरीकरणादरम्यान सीएसआर निधीअंतर्गत गावामध्ये आरोग्य शिबीर आयोजित | |

| | | |
|---|---|---|
| | करण्यात येतील असे सांगण्यात आले परंतु मागील १० वर्षांमध्ये हीच सुविधा देण्यात आली नाही. प्रकल्पधारकाने मागील १० वर्षातील आरोग्य शिबीरांबाबतचा हिशेब करून जी रक्कम होईल ती रक्कम गावाच्या विकास कामांमध्ये वापरली पाहजे. जर तस होत नसेल तर म.प्र.नि. मंडळ व मा. जिल्हाधिकारी कार्यालय कोणत्याही प्रकारची चौकशी न करता प्रकल्पास परवानगी देत आहेत असा त्याचा अर्थ होतो व याबाबत आम्हाला आक्षेप आहे. | |
| ७ | रस्त्यालगत असणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने व खाणधारकाने धोरण ठरवून नूकसानग्रस्त शेतकऱ्यांना नूकसान भरपाई द्यावी. | |
| ८ | खाण धारकाने सादरीकरणामध्ये सांगितल्याप्रमाणे प्रकल्पामध्ये गावातील १८ बेरोजगारांना रोजगार देणार आहे. परंतु त्यात फक्त सुपरवायजर व तत्सम पदांकरिता रोजगार मिळणार. याठिकाणी केंद्र शासनाच्या वे. को.लि. च्या प्रकल्पांमध्ये नागरीकांचा उद्योगामध्ये वाटा म्हणून प्रकल्पग्रस्ताला जसे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून धरणग्रस्तांना प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्र देण्यात येते त्याच प्रमाणे खाण प्रकल्पग्रस्तांना वे.को.लि तर्फे देखील प्रकल्पाग्रस्ताचे प्रमाणपत्र देण्यात येत आहे व आवश्यकतेनूसार रोजगार देखील उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदर प्रकल्पात वांजरी व इतर गावातील किमान ५० टक्के प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगार स्थानकांना देण्यात यावा जेणेकरून गावातील बेरोजगारी कमी करता येईल. | |
| ९ | मी माझे लेखी निवेदन मा. अध्यक्षांकडे सादर केला आहे. आम्हाला मा. अध्यक्ष व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून वेळोवेळी सांगण्यात येते की, जनसुनावणीदरम्यान जनसुनावणी समिती उपस्थित नागरीकांचे म्हणणे ऐकणार आहेत त्यांना कुठल्याही प्रकारची परवानगी देता येत नाही. जनसुनावणीचे ईतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येतील. आजपर्यंत झालेल्या जनसुनावणीमधील उपस्थित केलेल्या मुद्यांची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे आपण जे ईतिवृत्त लिहीता हे कायदेशीर आहेत की बेकायदेशीर आहेत याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होतो. जर जिल्हाधिकारी यांच्या स्वाक्षरीने ईतिवृत्त शासनाकडे सादर केले जातात तर ते | |

| | | |
|---|---|---|
| | बेकायदेशीर कसे? जे आक्षेप आम्ही जनसुनावणीदरम्यान करूनही कार्यवाही होत नसेल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ हे जनसुनावणी आयोजित करताना बेकायदेशीर कागदांच्या आधारे परवनग्या देतात व स्थानिक नागरीकांना प्रदूषणाच्या विळख्यात ढकलतात असा माझा आक्षेप आहे. जर ही जनसुनावणी संवैधानक आहे किंवा असंवैधानिक आहे तर म.प्र.नि. मंडळाने घालून दिलेल्या अटी देखील असंवैधानिक आहेत. तसेच खाणपट्टाधारक अटी व शर्तीचे पालन करत नसेल तर खाणपट्टा धारकाविरोधात फौजदारी गुन्हा दाखल व्हायला हवा. तसेच उत्पादन घेत असताना नागरीकांना इजा पोहविण्याचा हक्क कोणत्याही उद्योजकाला नाही. जर नागरीकांना इजा होत असेल तर म.प्र.नि मंडळ उद्योजकाविरोधात कार्यवाही करणार अशी आशा आहे. | |
| १० | जमीनीबाबत अर्थकेअर लॅब यांनी सादर केलेला व शासनाच्या मृदुसंधारण विभागाने सादर केलेला अहवाल यांच्या तफावत आहे. जर अर्थकेअर लॅब ही संस्था १० x १० च्या खोलीत बसून अहवाल तयार करत असेल आणि शासनाचे विभाग जमीनीच्या उगवन क्षमतेच्या संदर्भात, पिकांवर होणाऱ्या परिणामाच्या संदर्भात व उत्पादनाच्या संदर्भातील अहवालासोबत साम्य नसेल तर त्याचा संबंध कोणाशी आहे याबाबतचा खुलासा म.प्र.नि. मंडळ कोणत्या जनसुनावणीमध्ये करणार आहे? सदर बाब शेतमजुराच्या आयुष्याशी संबंधित आहे. शेती हा पूर्णवेळ कायमस्वरूपी व्यवसाय आहे. खाणीचे जीवन हे १६-२० वर्षे इतके आहे. परंतु १६-२० वर्षे खाणकाम करून जमीनीचे शोषण करायचे व वर्षानुवर्षे शेती करणाऱ्या नागरीकांचे भविष्य उघड्यावर पाडण्याचा अधिकार खाणपट्टाधारक व म.प्र.नि. मंडळ यांना नाही. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात वृक्षारोपणाबाबतची माहिती देण्यात आलेली नाही. सन २०१२ पासून सन २०२२ पर्यंत या क्षेत्रामध्ये किती झाडे लावण्यात आली व आजतागायत त्यांची लांबी रूंदी किती झाली याबाबत कोणतीही माहिती अहवालमध्ये देण्यात आलेली नाही. वृक्ष लागवड केल्याचे देखील खाण परिसरात दिसत नाही. आजपर्यंत झालेल्या प्रत्येक जनसुनावणीमध्ये याबाबतची माहिती देण्यात येते. | |

| | | |
|---|---|---|
| | सादरीकरणामध्ये सांगित्याप्रमाणे ब्लास्टींग १२ किमी अंतरापर्यंत करण्यात येईल परंतु ब्लास्टींग करताना शेतातील पाईप व लहान मुलांना याचा त्रास होणार नाही व लगतच्या परिसरातील घरांचे नूकसान होणार नाही याची खबरदारी खाणधारकाने घ्यावी. मी परवा म.प्र.नि. मंडळाच्या कार्यालयास भेट दिली व तेथे असे निदर्शनास आले की सदर कार्यालयात उप-प्रादेशक कार्यालयात फक्त उप-प्रादेशक अधकारीच कार्यरत आहेत. त्यांच्या खाली कोणताही क्षेत्र अधिकारी नाही. ही चूक म.प्र. नि. मंडळाच्या मुख्यालयाची आहे. त्यामुळे म.प्र. नि. मंडळाला वणी तालुक्यातील वाढत्या प्रदूषणाकडे लक्ष देता येत नाही. सदर कार्यालयाच्या अखत्यारीत तीन जिल्हे येतात, त्यात वणी तालुक्यातील प्रदूषण स्फोटक आहे. तसेच आपण वणी रेल्वे सायडींगला दिलेल्या संमतीपत्रातील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन होताना दिसत नाही व कोणताही अधिकारी तेथे भेट देण्यात उत्सुक नाही. मी वेळोवळी लेखी तक्रारी देखील दिल्या परंतु त्याकडे दुर्लक्ष होत आहे व त्या परिसरात बेकायदेशीररीत्या कोल डेपो कार्यरत आहेत. वणी तालुक्यातील वाढत्या प्रदूषणास महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळच जबाबदार आहे व अनपेक्षितपणे व नकळत आपण स्थानिकांचा नरसंहार करीत आहात. जर आपण बेकायदेशिरपणे या जनसुनावणीस मंजूरी देत असाल तर आमच्यासाठी देखील पूर्ण मार्ग आहेत. या प्रकल्पाचे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यात आला आहे त्यात तथ्यांचा आधार घेतलेलाच नाही. जनसुनावणी म्हणजे एखाद्या प्रकल्पाकरिता जनतेचा अभिप्राय घेणे व तो शासनाकडे सादर करणे. येथे जनसुनावणी घेतली जात नसून फक्त सुनावणी घेण्यात येत आहे. म्हणजे जनतेने काहीच बोलावयाचे नाही जस चाललय तस चालू देणे. परिवहन विभागाकडे देखील दिलेल्या अनुमतीचा कागद कधीच नसतो. खाणधारकाने जनसुनावणी दरम्यान प्रस्तावित वाहतूकीबाबत जी माहिती दिली त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रादेशिक परिवहन विभागकडे असावे जेणेकरून बेकायदेशीरपणे होणाऱ्या वाहतूकीवर कारवाई करणे शक्य होईल. खाणधारकाने सादर केलेली माहिती तपासण्यात यावी व शासनाच्या विभागांकडून याची | |

| | | |
|---|---|---|
| | तपासणी करण्यात यावी व त्यानंतरच या जनसुनावणीस परवानगी देण्यात यावी. | |

२) **श्री. अवधूत महादेवराव देवाळकर, माजी सरपंच तथा उप-सरपंच, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या भूभागात वापरण्यात येणारी जमीन ही एका शेतकऱ्याची आहे. प्रकल्पामध्ये काम करणाऱ्या स्थानिक कर्मचाऱ्यांना कुठल्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध होत नाही. या क्षेत्रात जेव्हा जेव्हा शेतीवर अन्याय झाला तेव्हा तेव्हा गरीब शेतकऱ्यावरच अन्याय झाला. या गावात जवळ ब्रम्हदेवाचे मंदीर आहे व येथे कोणत्याही प्रकारचे विकासकामे राजकीय व्यक्तिंकडून करण्यात आलेले नाही. प्रत्येकाने या प्रकल्पाचा विरोध केला. वांजरी व राजूर या दोन्ही गांवाना जोडण्यासाठी येथे रस्ता उपलब्ध नाही. आम्हाला राजूर येथील कृषी उत्पन्न बाजार सोईचे पडते. प्रकल्पधारकाने स्थानिक नागरीकांना प्रकल्पामध्ये रोजगार उपलब्ध करून द्यावा. तसेच त्यांना नियमाप्रमाणे योग्य ते वेतन व सोई-सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. तसेच गावातील मुख्य रस्त्यांचे विकासकामे करावीत. आपणांस वारंवार विनंती करतो की, वांजरी ते राजूर या रस्त्याचे बांधकाम करण्यात यावे व प्रकल्पास मंजूरी देण्यात येऊ नये. | |

३) **श्री. अनिल मधुकर देऊळकर, सरपंच, गामपंचायत मजरा, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेलाअनुसरुनप्रकल्पधारकांनीदिलेलीउत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमचे हे क्षेत्र हे खाणपट्टा म्हणून घोषित आहे. या क्षेत्राची सीमा १० किमी पर्यंत करण्यात आली आहे जे चुकीचे आहे. या क्षेत्रातून जमा होणारा खनिज विकास निधी हा लगतच्या क्षेत्रात वापरण्यात येत नसून खाणीपासून दूर अंतरावर असलेल्या गावांमध्ये वापरण्यात येतो. खनिज विकास निधी अंतर्गत ज्या सुविधा आमच्या गावाला मिळायला पाहिजे होत्या त्या आजपर्यंत मिळालेल्या नाहीत. या खाणीतून जे उत्खनन होणार त्याचा किती टक्के निधी महसूल स्वरूपात देण्यात येतो याबाबतची कुठलीही माहिती आम्हाला देण्यात येत नाही. येथे | |

| | | |
|---|---|---|
| | खाणीसंदर्भात ज्या प्राथमिक सोई-सुविधा येथे उपलब्ध आहे किंवा कसे याबाबतची देखील माहिती देण्यात यावी. मी खाणधारकासोबत एक दिवसाअगोदर भेट घेऊन चर्चा केली की खाण परिसरातील पडीक जमीनीवर जास्तीत जास्त प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात यावी. सन २०२१-२२ मध्ये वाढत्या तापमानामुळे जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याकरिता आम्ही या क्षेत्रात १००० झाडे लावण्याचा संकल्प केला आहे. याबाबतचे निवेदन मा. उप-विभागीय अधिकारी व मा. तहसिलदार साहेब यांचेकडे सादर करण्यात येईल. तसेच प्रकल्पधारक व प्रकल्पग्रस्त नागरीकांना विनंती आहे की त्यांनी याबाबत सहकार्य करावे. मजरा वांजरी या गावाकरिता प्राथमिक आरोग्य केंद्र राजूर येथे आहे. वांजरी ते राजूर या रस्त्यावर या खाणीची वाहतूक होत असून त्या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. प्रकल्पाधारकास विनंती आहे की त्यांनी लवकरात लवकर या रस्त्याची डागडूजी करावी किंवा सदर रस्त्याचे बांधकाम करावे. मागच्या वर्षी वणी ते वरोरा या रस्त्याचे बांधकाम करण्यात आले. रस्त्यांचे बांधकाम करताना या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उत्खनन करण्यात आले व जडवाहनांची वर्दळ या ठिकाणी वाढली. जड वाहनांच्या वाहतूकीमुळे शेतीलगतच्या रस्त्यांची अवस्था खराब झाली. प्रकल्पधारकांना विनंती आहे की त्यांनी या रस्त्याची डागडूजी करून परिस्थिती सुधारावी. तसेच शेतकऱ्यांचा शेतात वाहतूकीदरम्यान वाहनातून पडणारा दगड हा शेतात पडून जमीनीची प्रत कमी होत आहे. वरील सर्व समस्यांकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन या समस्या सोडवाव्यात ही विनंती. | |

४) **श्री. अमोल कुंभारे, उप-सरपंच, ग्रामपंचायत वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेलाअनुसरुनप्रकल्पधारकांनीदिलेलीउत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जो रस्ता लाईमस्टोन खनिजाच्या वाहतूकीकरिता वापरण्यात येत आहे त्या रस्त्याचे सर्वप्रथम डांबरीकरण करण्यात यावे व त्यानंतरच सदर रस्त्यावरून वाहतूकीकरिता परवानगी देण्यात यावी. लाईमस्टोनच्या | |

| | | |
|---|---|---|
| | वाहतूकीमुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतपिकांचे नूकसान होणार आहे त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना याची नूकसान भरपाई देण्यात यावी. तसेच आरोग्याच्या दृष्टीने दरमहा परिसरातील गावांमध्ये आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात यावे. ब्लास्टींगमुळे परिसरातील बोरवेल, ट्युबवेल व विहीरींमधील भूजल पातळी खालावण्याची शक्यता आहे त्याकरिता उपाययोजना करण्यात यावी. खाणबाधित क्षेत्रामध्ये वृक्ष लागवड करण्यात यावी. धुळीचे प्रदूषण रोखण्यासाठी फॉगींग मशीनचा वापर करण्यात यावा तसेच डस्ट अरेस्टर लावून धूळ संग्रहीत करण्यात यावी. ब्लास्टींगमुळे आजु-बाजूच्या परिसरातील घरांचे नूकसान होऊन जिवीतहानी होण्याची शक्यता आहे. तसे आढळल्यास संबंधितांना नूकसान भरपाई देण्यात यावी व असे लेखी स्वरूपात देण्यात यावे. वांजरी गावातील रस्ते, भूमिगत नाली, वीज, शाळा, सभागृह, बगीचा व स्मशानभूमी व इतर आवश्यक सोई-सुविधा याकरिता किती CSR निधी खर्च करण्यात येईल याची माहिती देण्यात यावी. तसेच वार्षिक स्वरूपात विकास निधी देण्यात यावा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सभागृह परिसरात अधिभार ढिगाऱ्याची विल्हेवाट लावून भू-भरणा करून वृक्ष लागवड करण्यात यावी. तसेच वांजरी गावातील पांदण रस्त्यांवर अधिभार ढिगारे टाकून रस्ते बनविण्यात यावे. लाईमस्टोन उत्खननादरम्यान पसिरात मोठे गड्ढे तयार होतील ज्यामुळे जनावरांचे अपघात होणार आहे. त्याकरिता खाण क्षेत्राभोवताल ताराचे कुंपण करण्यात यावे जेणेकरून जनावरांचे नूकसान होणार नाही. ज्या प्रकल्पात उत्खनन झालेला लाईमस्टोन वापरण्यात येणार आहे त्या प्रकल्पात गावातील स्थानिक बेरोजगारांना रोजगार देण्यात यावा. उपरोक्त सर्व बाबींची पूर्तता लेखी स्वरूपात वांजरी ग्रामपंचायतीली देण्यात यावी. | |

५) **<u>श्री. अनिल गेडाम, वांजरी, ता.वणी, जि. यवतमाळ:-</u>**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझी शेती कळमना येथे गट नं. १५६ येथे स्थित आहे. सदर प्रस्तावित खाणीपासून जी मालवाहतूक | |

| | | |
|---|---|---|
| | होते ती अनधिकृतरीत्या होते. सदर रस्ता माझ्या शेतीमधून जात असून त्यामुळे माझ्या शेतीचे नूकसान होत आहे. सदर लाईमस्टोनच्या वाहतूकीमुळे धूळ उडून माझ्या शेतमालाची प्रत खालवली आहे. महसूल विभागाच्या कोणत्याही नकाशात सदर रस्त्याचा उल्लेख नाही. त्यामुळे सदर रस्ता अनधिकृत आहे. | |

## ६) श्री. आशिष फुलसंगे, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज येथे प्रदूषण महामंडळातर्फे जनसुनावणी होत आहे. माझा जनसुनावणी समितीपुढे प्रश्न आहे की, सदर जनसुनावणी ही ग्रामपंचायत, तहसिल कार्यालय किंवा प्रकल्प स्थळ घेतली जाते याबाबत स्पष्टीकरणे देण्यात यावे. माझ्या निदर्शनास प्रथमच जनसुनावणी ही प्रकल्प स्थळी घेण्यात येत आहे. मागे सन २०११-१२ मध्ये जनसुनावणी खाण प्रकल्पाच्या स्थळी घेण्यात आली होती त्यावेळेस काही अनुचित प्रकार घडला होता. त्यामुळे माझे असे मत आहे की, सदर जनसुनावणी प्रकल्पस्थळी न घेता ती ग्रामपंचायत कार्यालय किंवा तहसिल कार्यालय येथे घेण्यात यावी. त्यामुळ माझे असे मत आहे की, सदर जनसुनावणी खुल्या जागेवर घेण्यात यावी जेणेकरून गावातील नागरीक, सरपंच, उप-सरपंच यांना माहिती होईल की आपल्या गावात कोणता प्रकल्प येत आहे व त्याचा आपल्या गावाला किती फायदा होईल. वणी व झरी जामणी तालुका हा कोळसा व चुनखडी सदृश्य खनिज पट्टा आहे त्यामुळे या क्षेत्रात कोळसा व चुनखडी खाण भरपूर प्रमाणात कार्यरत आहेत. त्यामुळे CSR निधीमधून आपण किती निधी खर्च केला याबाबत प्रकल्पधारकाने येथील नागरीकांना व्यवस्थित माहिती द्यावी. तसेच आपण किती निधी ग्रामपंचायतीला दिला याबाबत देखील माहिती द्यावी. तसेच खाणकाम करताना गावातील नागरीकांना त्यांच्या कुशलतेनूसार रोजगारात | |

| | | |
|---|---|---|
| | प्राधान्य देण्यात यावे. तसेच जर गावातील नागरीक अकुशल असतील तर शेजारच्या गावातील नागरीकांना प्राधान्य देण्यात यावे व दुसऱ्या राज्यातील बेरोजगारांना रोजगारात प्राधान्य देण्यात येऊ नये. अशा प्रकारचा दृष्टीकोण प्रकल्प धारकाचा असला पाहिजे. खाणीमध्ये ब्लास्टींगची एक विशिष्ट वेळ असली पाहिजे जेणेकरून नियंत्रित ब्लास्टींगमुळे परिसरातील घरांना तडे जाणार नाहीत. ब्लास्टींगमुहे शेजारच्या शेतकऱ्यांचे नूकसान होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. जर चुकून कोणाचे नूकसान होत असेल तर त्याकरिता वार्षिक नूकसान भरपाईची तरतूद या प्रकल्पात करण्यात यावी. वार्षिक नूकसान भरपाईची तरतूद आम्ही येथील काही खाण धारकांसोबत पाठपुरावा करून करवून घेतली आहे. महत्त्वाचा विषय असा आहे की खाणधारकाने गावाकरिता कोणत्या विकास कामांची तरतूद केली आहे. महाराष्ट प्रदूषण नियंत्रण मंडळ हे नेहमीच आरोपीच्या पिंजऱ्यात राहणार कारण वणी शहरात प्रदूषणाचे प्रमाण खूप जास्त प्रमाणात वाढले आहे. तसेच येथे १०-२० टनाची वाहतूक प्रस्तावित असते परंतु प्रत्यक्षात २०-३० टन मालाची वाहतूक होते. त्यामुळे रस्त्याची दुरावस्था होत असून प्रदूषणास आणखी कारणीभूत ठरते. तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग रस्त्यांच्या डागडूजीकडे दुर्लक्ष करते व त्यामुळे परिसरातील नागरीकांचे नूकसान होते. येथे प्रामुख्याने एकच मुद्दा आहे की सदर खाणप्रकल्पामुळे वांजरी गावाला कोणत्या प्रकारचा फायदा होणार? कोणत्या प्रकारची विकासकामे या क्षेत्रात होणार आहे याबाबतची माहिती येथे देण्यात यावी. आम्ही खाण प्रकल्पाच्या विरोधात नाही परंतु प्रकल्प येत असताना गावाचा विकास हा झालाच पाहिजे. | |

७) **श्री. रूपेश राहाटे, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी शेती खाणीच्या लगत असून त्याची लीज सन २००६ पासून देण्यात आली आहे. आता लीज वाढवून सन २०२६ पर्यंत देण्यात आली परंतु त्याबाबतचा मोबदला देण्यात आलेला नाही. प्रशासनाकडे वारंवार अर्ज देऊनही त्याकडे दुर्लक्ष केल्या जाते. | |

८) **श्री. बळीराम रोगे, शेतकरी, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझी एकूण जमीन ११ एकर ३२ आर असून सन २००७ मध्ये लीज संपुष्टात आलेली आहे. तसेच सन २०२६ पर्यंत लीज वाढविण्यात आल्याचे कळते. आज जनसुनावणी मला माहिती नसताना घेण्यात येत आहे. | |

९) **सौ. अरूणा जीवनराव जेनेकर, सरपंच, वांजरी ग्रामपंचायत, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | आज येथे प्रकल्पस्थळी जनसुनावणी घेण्यात येत आहे परंतु याबाबत गावातील नागरीकांना कोणत्याही प्रकारची माहिती न देताच आयोजित करण्यात आली आहे. ही जनसुनावणी ग्रामपंचायत कार्यालय किंवा तहसिल कार्यालय किंवा गावातील ऐखाद्या शाळेत घेण्यात आली असती तर येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या समस्या व्यवस्थितरीत्या जाणून घेता आल्या असत्या. सदर जनसुनावणी रद्द करून परत जनसुनावणी घेण्यात यावी. | |

१०) **श्री. अवधूत महादेवराव देवाळकर, माजी सरपंच तथा उप-सरपंच, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या क्षेत्रातील डोलोमाईट खाणींच्या क्षेत्राची तलाठी व ग्रामसेवकांमार्फत मोजणी करण्यात यावी व वांजरी गावासाठी योजनांचा लाभ देण्यात यावा. गावात | |

| | | |
|---|---|---|
| | व्यवस्थित रस्ते उपलब्ध नाहीत. जेव्हा जेव्हा गावातील महिला सरपंच या पदावर कार्यरत असते तेव्हा प्रशासनाकडे वारंवार विनंती करून देखील गावाला कोणऱ्याही योजनांचा लाभ होत नाही. आजच्या जनसुनावणी दरम्यान आपणांस विनंती आहे की, गावातील रस्त्यांचे काम लवकरात लवकर करण्यात यावे जेणेकरून येथे विकासकामे पार पाडता येतील. | |

## ११) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैदराबाद, तेलंगणा:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पास माझे समर्थन आहे. कंपनी १० कि.मी. क्षेत्रातील आरोग्याचा अहवाल तयार करून त्याबाबत अभ्यास करावा. भूजलाचे सर्वेक्षण करून त्याबाबतचा अहवाल सादर करावा. पावसाच्या पाण्याची साठवणूक करून त्याचा पुनर्वापर करावा. तसेच स्थानिक तरूणांसाठी कौशल्य विकास योजनेअंतर्गत कौशल्य विकासाचे शिबीरे आयोजित करून त्यांना रोजगाराकरिता प्रशिक्षण द्यावे. तसेच कंपनीने समन्वय समिती स्थापन करावी जेणेकरून स्थानिक नागरीक व कंपनीमध्ये सुसंवाद होऊन निर्माण होणाऱ्या समस्यांचे वेळोवेळी निराकरण करता येईल. | |

## १२) श्री. अविनाश वारवतकर, प्रकल्पधारक, वांजरी लाईमस्टोन खाण:-

| अ. क्र. | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | आम्ही या क्षेत्रात पुरेशी झाडे लावलेली आहेत. आठवड्यातून दोन दिवस जसे की सोमवार व शुक्रवार या दोन दिवशी ब्लास्टींग करण्यात येते. |

## १३) श्री. बळीराम रोगे, शेतकरी, वांजरी, ता. वणी, जि. यवतमाळ:-

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझ्या जमीनीचा मोबदला आजतागायत मिळालेला नाही. | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, महसूल विभागातील आपल्या जमीनीची कागदपत्रे तपासल्यानंतर निर्णय घेण्यात येईल. |

१४) **श्री. अतुल सातफळे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर:-**

| अ.क्र. | सूचना |
|---|---|
| १ | प्रकल्प प्रवर्तकाने जनसुनावणी दरम्यान उपस्थित झालेले मुद्दे जसे खाणीपासून गावापर्यंतच्या रस्त्यावरील होणारी जडवाहतूक, वृक्षारोपणाबाबत सविस्तर माहिती, ब्लास्टींगबाबतची माहिती इत्यादीबाबत सविस्तर माहिती द्यावी. |

१५) **श्री. किशोर जाधव, पर्यावरण सल्लागार, मे. अर्थकेअर लॅब्स प्रा. लि., नागपूर:-**

| अ.क्र. | सूचना |
|---|---|
| १ | सद्य:स्थितीत खाणीपासून गावापर्यंतच्या रस्त्यावर आवश्यक वृक्षारोपण करण्यात आलेले नाही. खाणीपासून गावाच्या रस्त्यापर्यंत सुमारे ८० झाडे लावण्याचे प्रस्तावित आहे. सन २०१३ पासून खाणीला परवानगी मिळालेली आहे परंतु खाण आजपर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यरत नाही. त्यामुळे पुरेसे वृक्षारोपण करण्यात आलेले नाही तथापी खाण परिसरामध्ये सुमारे ३०० झाडे लावण्यात आलेली आहेत. त्यामधील काही झाडे नैसर्गिक लागलेली आहेत. पसिरातील सर्व खाणधारक मिळून गावापर्यंत जाणाऱ्या रस्त्यालगत झाडे लावतील व रस्त्याची डागडूजी करण्यात येईल. तसेच खाण परिसरामध्ये भविष्यात सुमारे ३००० झाडे लावण्याचे व त्याचे संगोपन करण्याचे प्रस्तावित आहे व याबाबत लेखी आश्वासन देण्यास प्रकल्प प्रवर्तक तयार आहे. परिसरातील सर्व खाणधारक गावातील रस्त्याचा वापर करतात. त्यामुळे परिसरातील सर्व खाणधारक मिळून या परिसरातील रस्त्यांचे विकासकामे करतील. उन्हाळ्यामध्ये भूजल पातळीच्या स्तरामध्ये घट होतच असते. परंतु खाणकाम करताना सुमारे ९ हेक्टर क्षेत्रात येथे तळे तयार होणार आहे. ज्यामुळे येथे भविष्यात लगतच्या शेतीसाठी पाण्याचा तुटवडा निर्माण होणार नाही. ज्या शेतकऱ्यांना या तळ्यातील पाण्याची आवश्यकता असेल त्यांनी मशीन लावून पाण्याचा उपसा केल्यास हरकत नाही. |

१६) **श्री. विजय आनंदराव पिदूरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकाने जबाबदारीने उत्तरे दिलेली नाहीत तसेच चुकीची माहिती दिलेली आहे त्यामुळे सुनावणी रद्द करण्यात यावी. जनतेची फसवणूक होत आहे. खाण उत्खननाला विरोध नाही परंतु प्रदूषणामुळे परिसरातील नागरीकांच्या आरोग्याला व शेतीला धोका निर्माण झालेला आहे. प्रकल्प प्रवर्तकाने कार्यकारी सारांश व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात दिलेली माहिती खोटी/चुकीची आहे. त्यामुळे खाणधारकावर गुन्हा दाखल करण्यात यावा. खाणीपासून सुमारे ७ किमी | अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

| | | |
|---|---|---|
| | अंतरावर स्थित पुरातन काशिमाता देवी मंदीर स्थित असून त्याचा उल्लेख अहवालात केलेला नाही. सदर मंदिराला जाण्याकरिता व्यवस्थित रस्ता उपलब्ध नाही. खाण प्रदूषणामुळे व रस्त्यांच्या दुर्दशेमुळे लगतच्या परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात येत आहे. खाणधारकाने अद्यावत हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा बसविलेली नाही. खाणधारकाकडून प्रदूषण रोखण्याबाबत म.प्र.नि. मंडळ हमी घेत असेल तर आमची या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास काहीही हरकत नाही. | |

**१७)श्री. किशोर जाधव, पर्यावरण सल्लागार, मे. अर्थकेअर लॅब्स प्रा. लि., नागपूर:-**

| अ. क्र. | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | खाणीपासून गावाच्या रस्त्यापर्यंत व पुढे १० ते २० टन क्षमतेची ट्रक वाहतूक होणार आहे. हवा प्रदूषण कमी करण्यासाठी फॉगर मशीन लावण्यात येतील. स्थानिकांच्या समस्येचे निवारण करण्याबाबत लेखी स्वरूपातसुद्धा लिहून देण्यात येईल. आपण सूचविलेली सर्व कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. तसेच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून अंतिम सुधारीत अहवाल सादर करण्यात येईल. |

**१८) श्री. अतुल सातफळे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर:-**

| अ.क्र. | सूचना |
|---|---|
| १ | जनसुनावणी दरम्यान उपस्थित झालेल्या सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच प्रकल्प प्रवर्तकाने उपस्थित मुद्यांची नोंद अंतिम अहवालात घ्यावी व त्यानूसारच तो सादर करावा. |

**१९) डॉ. आगलावे, अध्यक्ष, मानवाधिकार संघटना, विदर्भ क्षेत्र:-**

| अ.क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | माझ्याकडे तक्रार आलेली आहे की, सदर खाणीचे मुळे मालक श्री. वरवतकर नसून श्री. डीकॉस्टा आहेत. खोट्या दस्तऐवजांच्या आधारे श्री. वरवतकर यांनी खाणीची परवानगी घेतली व शासनाने भाडेतत्वावर उत्खननाची परवानगी दिली. सदर प्रकरणाची चौकशी होणे गरजेचे आहे. | |

| | | |
|---|---|---|
| | श्री. वरवतकर हे खाणीचे मालक नाहीत. श्री. डीकॉस्टा यांचा स्वर्गवास सन २०१३ मध्ये झालेला असून त्यांच्या मुखत्यारपत्राच्या आधारे सर्वे नं. ३९४ या जागेवर स्थित खाणीची लीज सन २०२६ पर्यंत कशी वाढवून देण्यात आली. मूळ मालकाचे ना-हरकत प्रमाणपत्रच नाही त्यामुळे ही जाहीर लोकसुनावणी रद्द करण्यात यावी. सदर प्रकरणामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. त्याची चौकशी व्हावी व फौजदारी कार्यवाही व्हावी. अध्यक्ष महोदयांनी सदर मुद्यावर लक्ष द्यावे. श्री. वरवतकर मूळ मालक नसल्यामुळे विस्तारीकरणाची परवानगी देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. लगतच्या गावासाठी काहीच विकासकामे केलेली नाहीत. सदर प्रकरणाबाबत लेखी स्वरूपात आक्षेप नोंदविलेला असून त्याबाबत चौकशी करण्यात यावी. | |

**२०) श्री. अविनाश वारवतकर, प्रकल्पधारक, वांजरी लाईमस्टोन खाण:-**

| अ. क्र. | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|
| १ | सदर खाण सन २००३ मध्ये हस्तांतरीत झालेली आहे. त्यापूर्वी सन १९९८ मध्ये मूळ मालकाने खाण हस्तांतरणाबाबत अर्ज केला होता. |

**२१) अध्यक्ष, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती:-**

सदर जाहीर लोकसुनावणी दरम्यान नागरीकांकडून उपस्थित सर्व मुद्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. तसेच लेखी मुद्यांचीसुद्धा नोंद घेण्यात आली आहे. प्रकल्प प्रवर्तकाने उपस्थित मुद्यांनूसार आपला सुधारत अहवाल म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांचेकडे सादर करावा. खाण मालकीबाबतचे सर्व महसूली दस्तऐवज तपासण्यात येतील व त्याअनुषंगाने महसूल विभागाकडून उत्तर सादर करण्यात येईल व सर्व संबंधितांना कळविण्यात येईल.

अध्यक्ष यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व हवामान बदल

विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्याप्रमाणे सदरहू अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

**(अतुल पु. सातफळे)**
समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(अ. मा. करे)**
सदस्य, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

**(ललितकुमार वऱ्हाडे)**
अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती तथा निवासी उप-जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ